# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web: www.ropune.org.in


जा. क्र. तंशिविकापु/विवि/२०१६-१७/ 4450 दिनांक : 28 OCT 2016

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे विभागातील सर्व व्यवस्थापनशास्त्र / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील एमबीए/एमएमएस आणि एम फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अखिल भारतीय कोटयातील प्रवेशासाठी एआयसीटीई दवारे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा.

संदर्भ : १) क्र.टिईएम-२०१५/सीआर५३६/टिई-४, दिनांक ११ मार्च २०१६.
२) क्र.टिईएम-२०१५/१२१०/प्र.क्र.४३९/तांशि-४, दिनांक २८ सप्टेंबर २०१५.
३) संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/प्रवेश/२०१६/१४५४ दिनांक २७/१०/२०१६.

संदर्भिय अधिसूचनेनुसार व संदर्भ क्र.३ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्रान्वये विषयांकीत अभ्यासक्रमाच्या २०१७-१८ मधील अखिल भारतीय कोटयातील प्रवेशासाठी खालीलप्रमाणे प्रवेश परीक्षा निर्धारित केलेली आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश परीक्षा | नोदणी प्रक्रिया तपशील |
|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष एमबीए /एमएमएस | CMAT | नोंदणी दि.१०/१०/२०१६ ते १०/१२/२०१६<br>अधिक तपशीलासाठी संकेतस्थळ<br>http://www.aicte-cmat.in/candidate/login.aspx# |
| २ | प्रथम वर्ष एम. फार्मसी | GPAT | नोंदणी दि.१०/१०/२०१६ ते १०/१२/२०१६<br>अधिक तपशीलासाठी संकेतस्थळ<br>http://www.aicte-gpat.in/college/Index_New.aspx |

उपरोक्तप्रमाणे सूचना आपण आपल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रवेशोच्छूक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सोबत : तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.यांचे पत्राची प्रत.

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी – २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स – २२६९२१०२.
E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

क्रमाक:२अ/एडीएम/प्रवेश/२०१६/ 9454
दिनांक : 27 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१७ – १८ मधील एमबीए/एमएमएस आणि एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षेबाबत....

संदर्भ :-१) क्र.टिईएम- २०१५/सीआर५३६/टिई- ४, दि. ११ मार्च २०१६
२) क्र. टिईएम२०१५/१२१०/प्र.क्र.४३९/तांशि- ४, दि. २८ सप्टेंबर २०१५

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णय व अधिसूचनेनुसार राज्यातील एमबीए/एमएमएस या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी राज्याच्या सामायिक प्रवेश परीक्षा आणि अखिल भारतीय कोटयातील प्रवेशासाठी एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी CMAT ही एक प्रवेश परीक्षा निर्धारीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे अखिल भारतीय कोटयात प्रवेशोच्छुक उमेदवारानी सदर परिक्षेला बसणे ईष्ट राहील.

तसेच एम फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी राष्ट्रीय पातळीवरील GPAT परीक्षा निर्धारीत करण्यात आलेली आहे.त्यानुसार राज्यातील प्रथम वर्ष एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१७ – १८ मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व उमेदवारांना राष्ट्रीय स्तरावरील GPAT परीक्षा देणे अनिवार्य आहे.

वरीलपैकी एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अखिल भारतीय स्तरावरील CMAT परीक्षेसाठीची Registration प्रकिया दिनांक १०.१०.२०१६ पासून सुरू झालेली असून रजिष्ट्रेशनसाठी अंतिम दिनांक १०.१२.२०१६ आहे. याबाबतची अधिक माहिती http://www.aicte-cmat.in/candidate/login.aspx# या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

एम.फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अनिवार्य केलेल्या एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी अखिल भारतीय स्तरावरील GPAT परीक्षेसाठीची Registration प्रकिया दिनांक १०.१०.२०१६ पासून सुरू झालेली असून रजिष्ट्रेशनसाठी अंतिम दिनांक १०.१२.२०१६ आहे. याबाबतची अधिक माहिती http://aicte-gpat.in/College/Index_New.aspx या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

तरी आपल्या विभागातील सर्व एमबीए/एमएमएस तसेच औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाना याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच सोबतची सूचना त्यांच्या महाविद्यालयातून सूचना फलकावर प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी दर्शविण्याबाबत कळविण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत: प्राचार्य/संचालक, सर्व व्यवस्थापनशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास वरील बाब आणावी.

D:\OLD PC DATA\Admission २०१७- १८\GPAT compulsory notification.docx